नि.फौ.ख. क्रमांक.२३३/२०२०
सरकार विरुध्द पांडुरंग व इतर
निशाणी क्रमांक –८५.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०७**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – हनुमंत दिगांबर गुट्टे,
वय -४६ वर्षे, धंदा - होमगार्ड,
रा. अहमदपूर, ता.अहमदपूर जि.लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती काकडे**

**०१.** मी सन २००२ पासून होमगार्ड म्हणून काम करतो. दि.०५/१०/२०२० रोजी माझी किनगांव पोलीस ठाणे अंतर्गत लॉकअप गार्ड म्हणून नेमणुक होती. त्या दिवशी पोलीस ठाण्याच्या आवारातून टिप्पर अज्ञात इसमांनी नेला होता. पोलिसांनी माझे टिपन व पुरवणी जबाब नोंदविला होता.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०५/१०/२०२० रोजी गुन्हा रजिस्टर क्र.११५/२०२० मधील आरोपी लॉकअपमध्ये होते, त्याठिकाणी माझी डयुटी होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस निरीक्षक यांना वाळू चोरीबाबत माहिती मिळाल्यानंतर मी त्यांच्यासोबत गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, वाळू चोरीचा टिप्पर ताब्यात घेवून तो पोलीस ठाण्यात लावण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या टिप्परचा क्र.एम.एच.२५, यु.१८९९ होता. त्यादिवशी पो.ना.शेख व होमगार्ड घुगे हेही डयुटीवर होते. हे म्हणणे खरे आहे की, हा टिप्पर या गुन्हयातील आरोपींनी पोलीस ठाण्यातून नेला होता. हे म्हणणे खरे आहे की, टिप्पर पोलीस ठाण्यातून नेल्यानंतर पो.नि. अनसापुरे यांनी फिर्याद नोंदविल्याचे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी न्यायालयात हजर नाहीत. (आरोपी पांडुरंग नागरगोजे न्यायालयात हजर आहे, परंतु साक्षीदाराने त्याला ओळखले नाही.)

सरतपास पुर्ण.

**आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.भुरकापल्ले यांच्यामार्फत सुरुः-**

**०३.** माझे तपासटिपन कोणी नोंदविले हे मला सांगता येणार नाही. तपासटिपन मला वाचून दाखविले नव्हते. पोलीस ठाण्यातून टिप्पन नेण्यात आले, त्यावेळी वाळू चोरीचा गुन्हा दाखल झाला होता किंवा नाही हे मला माहिती नाही. घटनेतील टिप्पर कोठून जप्त केला व कोठे लावला हे मला माहिती नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी टिप्पर नेताना मी प्रत्यक्ष

पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर खोटा व चुकीचा आहे.

उलटतपास पुर्ण.
**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -०९.०१.२०२६